NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## विशेष कक्ष विभाग
## -: परिपत्रक :-

सर्व संलग्नित महाविद्यालये, मान्यता प्राप्त शिक्षण संस्था व संकुलांना या परिपत्रकान्वये सूचित करण्यात येते की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या व सेट/नेट परीक्षा देऊ इच्छिणा-या मागासवर्गीय व इतर प्रवर्गातील उमेदवारांसाठी गुरुवार, दिनांक ०५/०३/२०२० रोजी मोफत सेट/नेट पेपर क्र. १ प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. सदर प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन मा. कुलगुरु महोदया व उपस्थित विषय तज्ञांच्या शुभहस्ते गुरुवार, दि. ०५/०३/२०२० रोजी सकाळी १०.३० वाजता विद्यापीठ सभागृहात होणार आहे.

| तारीख | वेळ | विषय | प्रशिक्षण शिबीराचे ठिकाण |
|---|---|---|---|
| गुरुवार, दि.०५/०३/२०२० | सकाळ सत्र<br>स. ११:०० ते १:०० | पेपर क्र. १ | विद्यापीठ सभागृह |
| | दुपार सत्र<br>दु. २:०० ते ६:०० | | |

वरीलप्रमाणे सर्व पात्र उमेदवारांना प्रशिक्षण कार्यशाळा खुली असून, प्रशिक्षण कार्यशाळेमध्ये इतर विद्यापीठातील तज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. तरी सर्व इच्छुक उमेदवारांनी स्वखर्चाने सकाळी ठिक १०:०० वाजता उपस्थित राहून, या प्रशिक्षण कार्यशाळेचा लाभ घ्यावा.

[डॉ. शि. ना. शिंदे]
**सहा.कुलसचिव**
**विशेष कक्ष विभाग**
**शैक्षणिक, संशोधन आणि विकास**

**जा. क्र. पुअहोसोविसो/विशेष कक्ष/२०२०/** 2053
**दिनांक :** 26 FEB 2020

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक,**
**सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त शिक्षण संस्था/विद्यापीठ संकुले,**
**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,**
**सोलापूर.**

❖ **टिप - सर्व संलग्न महाविद्यालये, मान्यता प्राप्त शिक्षण संस्था व संकुले यांना विनंती की, सदरचे परिपत्रक सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावे.**